# असा आहे भुयारी मेट्रोचा आरे डेपो



लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ दरम्यानच्या भुयारी मुंबई मेट्रो-३च्या आरेमधील कार डेपो उभारणीतील कारशेडचे ६५.३ टक्के काम पूर्ण झाले असल्याचा दावा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने केला आहे.

मेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी संचालक (प्रकल्प) सुबोध गुप्ता आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांसह आरेच्या कार डेपोला भेट देऊन कामाची पाहणी केली. तेथील कार्यशाळा, देखभाल, ओसीएस इमारत, स्थानकाची कामे, स्टेबलिंग लाईन, ट्रॅक यासह विविध कामांचा आढावा त्यांनी घेतला.

दरम्यान, मुंबई मेट्रो-३च्या वतीने पावसाळ्यात पुरापासून बचाव करण्यासाठी कामे सुरू असलेल्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात डी-वॉटरिंग पंपांची व्यवस्था करण्यात आली आहे.

अभियंते आणि कंत्राटदारांनी सर्व ठिकाणी पावसाळ्यापूर्वीची कामे सुरू केली होती आणि ती पावसाच्या आगमनापूर्वी पूर्णत्वास येत आहेत.





कुलाबा-वांद्रे-सीप्झ दरम्यान धावणाऱ्या भुयारी मेट्रोच्या कार डेपोचे आरे येथे सुरू असलेले काम.

**भुयारी मार्ग** — ३३.५ किमी कुलाबा-वांद्रे-सीप्झ मार्ग | एकूण स्थानके २६ | भुयारी १ | जमिनीवर

**पहिला टप्पा** — आरे ते बीकेसी | एकूण स्थानके १० | भुयारी १ | जमिनीवर | १२.४४ किमी अंतर

**दुसरा टप्पा** — बीकेसी ते कफ परेड | एकूण स्थानके १७ | भुयारी | २१.३५ किमी अंतर

**मेट्रो मार्ग : ३ चा विस्तार** — कफ परेड ते नेव्ही नगर



एकूण स्थानके १ | नेव्ही नगर स्थानक | २.५ किमी अंतर